## नि.दि.मु.क्र.०५/२०१८ मधील निशाणी ५९ वरील आदेश

**(जनार्दन कुबल वगैरे वि.मकरंद टांककर वगैरे)**

**सीएनआर क्र. एमएचएसआय–०५–००००६०२०१८**

**०१.** प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेचे कलम १० अन्वये प्रस्तुत दाव्याचे कामकाज स्थगित करण्यात यावे याकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** प्रतिवादी यांच्या अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी मे. तहसिलदार वेंगुर्ला यांचे न्यायालयात चालू वहिवाट दावा क्र. ०२/२०१६ हा वादी क्र. १ ते ५ यांचेविरुध्द दाखल केलेला होता. सदर चालू वहिवाट दावा क्र. ०२/२०१६ हा दि. ०३/०१/२०१७ रोजीच्या आदेशाद्वारे मंजूर करण्यात आला. सदर न्यायनिर्णयाविरुध्द वादी क्र. १ ते ४ यांनी मे. अप्पर जिल्हा अधिकारी, सिंधुदुर्ग यांचे न्यायालयात पुनरावलोकन अर्ज व तद्नंतर ना.मुंबई उच्च न्यायालयामध्ये सिव्हील रिव्हीजन अर्ज क्र. ५२५/२०१७ दाखल केला व सदर प्रकरण अंतिम आदेशाद्वारे फेरचौकशीकरीता मे.अप्पर जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे न्यायालयात परत पाठविण्यात आले. मे.अप्पर जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांनी दि.०६/०१/२०१८ रोजीच्या आदेशाद्वारे प्रस्तुत प्रकरण फेरचौकशीसाठी तहसिलदार वेंगुर्ला यांचेकडे परत पाठविले असून ते प्रलंबित आहे. सदर चालूवहिवाट दाव्यामध्ये व प्रस्तुत दाव्यामध्ये उभयपक्षकारांनी उपस्थित केलेले वादविषयक मुद्दे व हक्कसंबंध हे सारखेच आहेत. दोन्ही प्रकरणातील पक्षकार देखील सारखेच आहेत. सबब, दिवाणी प्रक्रिया संहितेचे कलम १० अन्वये वादी यांचा दावा स्थगित करणेत यावे व अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

**०३.** वादी यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, प्रस्तुत अर्ज खोटा, खोडसाळ असून तो वादी यांना मान्य व कबूल नाही. वादी यांनी त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दि.११/०६/२०१९ रोजी निशाणी २६ येथे दाखल केले असून त्यानंतर प्रतिवादींतर्फे वादीचा उलटतपास घेण्याकरीता दि.२८/११/२०१९, १४/१०/२०२१, २४/११/२०२१, १२/१/२०२२, २३/२/२०२२, २५/०३/२०२२, २७/०७/२०२२,

२६/८/२०२२, १२/१०/२०२२, ११/११/२०२२, ९/१२/२०२२ व २५/०१/२०२३ या तारखांना मुदतीचे अर्ज देण्यात आले. त्यानंतर दि.२९/०३/२०२३ रोजी उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला व दि. २६/०४/२०२३ रोजी निशाणी ५७ येथे उलटतपास नाही हा आदेश रद्द करण्यात आला. दि.१४/०७/२०२३ रोजी निशाणी ५७ वरील आदेशान्वये वादीस खर्चाची रक्कम रु.५००/– देऊन उलटतपास घेण्याकरीता पुढील तारीख देण्यात आली. दि.११/०८/२०२३ रोजी वादीचा उलटतपास घेण्याकरीता मुदतीचा अर्ज दाखल करण्यात आला व तद्नंतर वादीचा उलटतपास घेण्याची प्रतिवादींनी तजवीज केली नाही.

**०४**. वादी यांच्या पुढील कथनांनुसार, प्रतिवादी यांना त्यांच्या जमिनीत जाणारी निराळी वाट अस्तित्वात असताना तहसिलदार वेंगुर्ला यांनी चालू वहिवाट दाव्याचे कामी वादीस नोटीसा काढण्याअगोदर मंडळ अधिकारी वेंगुर्ले यांची नेमणूक करुन, सर्व कायदेशीर बाजूस फारकत देऊन चालूवहिवाट दावा क्र. ०२/२०१६ हा मंजूर केला. वादी यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका क्र.५२५/२०१७ हा दाखल केला व त्यामधील आदेशान्वये प्रस्तुत चालू वहिवाट दाव्याचे काम फेरतपासणीसाठी प्रकरण जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग येथे पाठविण्यात आले व जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांनी चालूवहिवाट दावा क्र. ०२/२०१६ मध्ये तहसिलदार वेंगुर्ला यांनी दिलेला आदेश रद्द करुन प्रकरण फेरसुनावणीसाठी पुन्हा तहसिलदार वेंगुर्ला यांचेकडे पाठविले. प्रतिवादी यांचे मुलकी अधिकाऱ्यांशी जवळचे संबंध आहेत. त्यामुळे आर्थिक व शारीरिक दृष्टया दुबळया/दुर्बल असलेल्या वादी यांना त्यांची प्रामाणिक बाजू असतानाही विनाकारण त्रास होत आहे. तसेच दावा मिळकतीतून जाण्यायेण्याची किंवा वहिवाटीच्या हक्काची कोणतीही वाट प्रतिवादी यांच्या मिळकतीत जाण्यायेण्यासाठी कधीही नव्हती व नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

**०५.** प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहितेचे कलम १० अन्वये दाखल असून सदर कलमांतर्गत तरतुदीनुसार, ''जर एखाद्या दाव्यामधील वादप्रश्न हा, त्याच पक्षकारांमध्ये अथवा त्याच हक्कान्वये वाद काढणाऱ्या ज्या पक्षकारांच्या पोटीते अगर त्यांच्यापैकी कोणीही हक्क सांगत असतील त्या पक्षकारांमध्ये पुर्वी सुरु केलेल्या दाव्यात देखील प्रत्यक्षपणे आणि सारत:

वादग्रस्त असेल आणि असा दावा त्याच न्यायालयामध्ये किंवा ज्या प्रकारची दाद मागितली आहे ती मंजूर करण्याची अधिकारीता असलेल्या [भारतातील] अन्य कोणत्याही न्यायालयामध्ये, अथवा [केंद्र शासनाने] स्थापन केलेल्या किंवा चालू ठेवलेल्या आणि तशीच अधिकारीता असलेल्या [भारताच्या] सीमेबाहेरील कोणत्याही न्यायालयामध्ये अथवा [सर्वोच्च न्यायालयापुढे संबंधित असेल तर, कोणत्याही न्यायालयाने या दाव्याची संपरीक्षा पुढे चालू करता कामा नये.'

०६. सदर तरतुदीच्या अनुषंगाने वादी व प्रतिवादी यांच्या कथनांचे अवलोकन केले असता प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार तहसिलदार न्यायालयामध्ये मामलेतदार कोर्ट ॲक्ट कलम ५ अन्वये दाखल प्रकरण हे मे.जिल्हाधिकारी यांनी फेरचौकशी करीता मे. तहसिदार वेंगुर्ला यांच्या न्यायालयात पाठविले असून सदर प्रकरणातील व प्रस्तुत दाव्यातील उभयपक्षकारांनी उपस्थित केलेले वादविषयक मुद्दे, हक्कसंबंध व पक्षकार सारखेच आहेत. त्यामुळे प्रस्तुतचे प्रकरण हे स्थगित करण्यात यावे अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे. सदर प्रतिवादी यांच्या कथनांच्या अनुषंगाने वादी यांनी दाखल केलेल्या दाव्याचे अवलोकन केले असता वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकत ही त्यांची मालकी व कब्जाभोग्याची आहे असे हक्कस्थापन होवून मिळणेकरीता व त्याअनुषंगाने कायमस्वरुपी मनाई तसेच वैकल्पीकरित्या दावा मिळकतीच्या कोणत्याही भागाचा कब्जा केल्याचे दिसून आल्यास तो परत मिळावा याकरीता दाखल केला आहे. त्यामुळे प्रथमत: वादी यांनी मागणी केलेली हक्कस्थापनेबाबतची दाद ही केवळ दिवाणी न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येणारी बाब आहे. तसेच प्रस्तुत दाव्यामध्ये वादी यांनी मागितलेला हक्कस्थापनेबाबतचा दिलासा देण्याचा अधिकार केवळ दिवाणी न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येतो. त्यामुळे प्रतिवादी यांचे अर्जामधील केलेले कथन हे दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १० मधील तरतूदींच्या कक्षेत येत नाही व केवळ मे.तहसिल न्यायालय यांच्या समोरील प्रलंबित अर्जातील वाद विषय व प्रस्तुत दाव्यातील वाद विषय तसेच पक्षकार हे सारखेच असल्यामुळे प्रस्तुत प्रकरण स्थगित ठेवण्याची प्रतिवादी यांची विनंती कायद्याने मान्य करता येणार नाही. त्यामुळे सद्यस्थितीत प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर होण्यास पात्र नाही. करीता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

प्रतिवादी यांचा निशाणी ५९ कडील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

SOURABH JAYKUMAR CHIVATE

Digitally signed by SOURABH JAYKUMAR CHIVATE
Date: 2026.02.12 16:43:36 +0530

दि. १०/०२/२०२६ (एस.जे.चिवटे)

वेंगुर्ला दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर वेंगुर्ला